औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची शनिवार दि. २१.१०.९५ रोजी झालेल्या ९८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] मा. श्री. किशनचंद तनवाणी | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] मा. श्री. भास्कर मुंढे मुख्य अधिकारी/औ.मं. | मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ. |
| ३] मा. श्री. दे. दि. गुन, उपसंचालक, नगररचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ४] श्री. गायकवाड, शहर अभियंता आयुक्त, म.न.पा. औरंगाबाद यांचे सदस्य प्रतिनिधी. | सदस्य/औरंगाबाद मंडळ [प्रतिनिधी] |

विषय :- दिनांक १८.३.९५ रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणेबाबत.

दिनांक १८.३.९५ रोजीच्या ९७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर चर्चा करीत असतांना मा. मुख्याधिकारी/औ.मं. यांनी असे प्रतिपादन केले की, रोशनगेट येथील वसाहतीतील जागा मॉडर्न एज्युकेशन शिक्षण संस्था या शैक्षणीक संस्थेने मागितलेली होती. सदर संस्थेचा अर्ज शिफारशीसह प्राधिकरणास पाठविण्यात आला आहे.

तसेच मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले की, सदर जागेसाठी मा. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांची सुध्दा मागणी आलेली आहे.

यावर मा. मुख्याधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांची विनंती प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावी.

९७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा करुन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्रमांक: ५९६

मंडळाच्या दिनांक १८.३.९५ च्या ९७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताचे वाचन होऊन रोशनगेट येथील वसाहतीतील मा. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांची मागणी प्राधिकरणाकडे पाठवावी असे ठरवून सभेचे इतिवृत्त कायम करणेत आले

विषय क्र. २: गंगापूर येथील पुरग्रस्तांसाठी १३८ घरकुलांच्या बांधकामाचा दोष दुरुस्तीचा कालावधी ३ वर्षांऐवजी १ वर्ष करणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मु.मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली व प्रतिपादन केले की, गंगापूर येथील १३८ घरकुलांच्या बांधकामाचा दोष दुरुस्तीचा कालावधी ३ वर्षे निश्चित होता. परंतु निविदा स्विकारल्यानंतर प्राधिकरणास शासनाकडून प्राप्त झालेल्या दि. ८.७.८३ नंतर दोष दुरुस्तीचा कालावधी १ वर्ष ठेवण्याचे ठरविण्यात आलेले आहे. त्यानुसार ठेकेदाराने अर्जाद्वारे गंगापूर येथील कामाचा दोष दुरुस्तीचा कालावधी १ वर्षाचा करावा अशी मागणी केली आहे.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९७

गंगापूर येथील पुरग्रस्तांसाठी १३८ घरकुलांच्या बांधकामाचा दोष दुरुस्तीचा कालावधी ३ वर्षांऐवजी १ वर्षावर प्राधिकरणाच्या धोरणानुसार करण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ३: परभणी नगरपालिकेमार्फत प्रगती, साखळा प्लॉट या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मु.मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचुन दाखविली. मंडळास माहिती दिली की, परभणी नगरपालिकेने साखळा प्लॉट या झोपडपट्टीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेस्तव सादर केला आहे. सदर झोपडपट्टी शासन राजपत्र दि. २६ फेब्रुवारी १९७९ अनुसार घोषित आहे व त्यातील लोकसंख्या ५३८८ आहे. नगरपालिकेने सादर केलेले अंदाजपत्रक रुपये २५,९५,५७५/- चे असून नियमानुसार त्यास रु. २५,५०,[illegible] ची प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

परभणी शहरासाठी सन १९९५-९६ करिता रु. ९.०० लाखाची तरतूद [विशेष घटक योजनेकरिता] आहे. नगरपालिकेच्या हाती रु. ७.८१ लाखाचे काम प्रगतीपथावर आहे. परभणी नगरपालिकेकडे असलेली रु. ९.०० लक्षाची तरतूद व भविष्यात नगरपालिकेकडे कामे असण्याकरिता साखला प्लॉट या झोपडपट्टीच्या सुधारणांच्या कामास प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन परभणी येथील साखला प्लॉट या झोपडपट्टीच्या सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता खालील अटीवर देण्यात येत आहे.

ठराव क्र. ५१८

१) नगरपालिकेने काम हाती घेतल्यानंतर सदरचा खर्च स्वतःच्या निधीतून केल्यानंतरच प्रतिपूर्ती करण्यात येईल. तसेच परभणी नगरपालिकेने जुनी कामे प्राधान्याने पूर्ण करावेत व परभणी नगरपालिकेने सादर केलेल्या देयकाची प्रतिपूर्ती निधीच्या उपलब्धतेनुसारच करण्यात येईल.

२) साखला प्लॉट या झोपडपट्टीच्या सुधारणा कामाच्या अंदाजपत्रकास रु. २५,५०,६८५/- ची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र. ४: जालना नगरपालिकेमार्फत प्राप्त झोपडपट्टी सुधारणा कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

सदर विषयाची बाब टिप्पणी अ. मुख्याधिकारी यांनी बैठकीस वाचून दाखविली व प्रतिपादन केले की, जालना नगर पालिकेने सय्यद नगर या झोपडपट्टीचा रु. ८,५१,३५९.०० चा प्रस्ताव प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सादर केला आहे. सदर झोपडपट्टी शासन राजपत्र दिनांक २३.२.१९९५ नुसार घोषित आहे व त्यातील लोकसंख्या १७०२ आहे. सय्यद नगर या झोपडपट्टीचा प्रस्ताव रु. ८,५१,३५९ चा असून नियमानुसार त्यास रु. ८,०१,१२२/- ची प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

जालना शहरासाठी सन १९९५-९६ या आर्थिक वर्षात रु. २.०० लक्षाची तरतूद आहे. जालना नगरपालिकेच्या हाती सध्या कुठलेही काम शिल्लक नाही. करिता सन १९९५-९६ ची तरतूद खर्च होण्याच्या दृष्टीने व जालना न.प. च्या हाती भविष्यात काम असण्याच्या दृष्टीने सदरहूनगर झोपडपट्टीच्या सुविधांच्या सुधार कामास प्रशासकीय मान्यता देता येईल असे मु.मुख्याधिकारी यांनी मंडळास सांगितले.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ५९९

---

नगरपालिकेने काम हाती घेतल्यानंतर सदरचा खर्च स्वतःच्या निधीतून केल्यानंतरच प्रतिपुर्ती करण्यात येईल व निधीच्या उपलब्धतेनुसारच प्रतिपुर्ती करण्यात येईल या अटीवरच जालना येथील सदरहूनगर या झोपडपट्टी सुधार कामाच्या अंदाजपत्रकास रु. ८,०१,१२२/- ची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विषय क्र. ५:- औरंगाबाद येथील श्रमिक पत्रकार संघाच्या सदस्यांना
१००% कर्जावर आणि हप्त्याची मर्यादा दुप्पट करुन
म्हाडाची घरे मिळणेबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी मु.मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचून दाखविली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६००

---

औरंगाबाद येथील श्रमिक पत्रकार संघाचा म्हाडातर्फे घर मिळण्याबाबतचा अर्ज मंडळाच्या शिफारशीसह सहानुभूतीने विचार करण्यासाठी प्राधिकरणाकडे पाठवावा.

विषय क्र. ६:- औरंगाबाद मंडळाचे सन १९९४-९५ चे वार्षिक लेखे.

या बाब टिप्पणीबाबतची सविस्तर माहिती मुख्य लेखा अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. त्यानुसार मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०१

औरंगाबाद मंडळाच्या सन १९९४-९५ चा वार्षिक लेखा प्राधिकरणास पाठवावा.

1 . :-

विषय क्र. ७:- १०५ गाळे हर्सूल औरंगाबाद येथील शिल्लक ६८ गाळे वाटपाबाबत.

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचून दाखविली त्यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६०२

हर्सूल औरंगाबाद येथील शिल्लक ६८ गाळे म.न.पा. च्या कर्मचाऱ्यांकडून फक्त रु. १३,५००/- (आय.डी.पी.) पोटी रक्कम घेऊन माहे १/९५ ते मे ९५ चे मासिक हप्त्याची रक्कम रुपये १०२५/- ही समान १० हप्त्यात देण्याच्या अटीवर केलेल्या वाटपास मंडळाने कार्योत्तर मान्यता प्रदान केली.

विषय क्र. ८: दै. लोकमत व दै. देवगिरी तरुण भारत यांना दिलेल्या जाहिरातीचे देयके वाणिज्य दराने पारीत करणेबाबत.

....

या विषयाची बाब टिप्पणी म. मुख्याधिकारी यांनी मंडळास वाचून दाखविली. तसेच प्रतिपादन केले की, दैनिक लोकमत व दैनिक तरुण भारत

या वृत्तपत्रांनी वाणिज्य दराने जाहिरातीचे देयके पारीत करावी असे कळविले आहे. तसेच यापुर्वी दै. लोकमत या वृत्तपत्रास आतापर्यन्त रु. ११०/- व दै. तरुण भारत ला रु. ६०/- प्र. कॉ. से. मी. प्रमाणे वाणिज्य दर मंडळाने दिलेला आहे. परंतु लोकमतने दि. २२. ३. ९५ च्या पत्रान्वये दि. १५. १२. ९४ पासून रु. १४०/- प्रमाणे वाढीव दर मागितला असुन दै. दै. तरुण भारतने १८. ४. ९५ च्या पत्रान्वये रु. १००/- वाढीव दर मागितला आहे.

या विषयावर चर्चा करतांना मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, जे दैनिक शासन मान्य दराने जाहिराती प्रसिध्द करतील त्यांनाच जाहिराती द्याव्यात. वाणिज्य दराने देयके पारीत करु नये.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्र. ६०३</u>

मंडळाने सर्व वृत्तपत्रांना पत्रे पाठवुन कळवावे की, प्राधिकरण ही शासकीय संस्था असुन मंडळाच्या जाहिराती, निविदा या शासन मान्य दराने प्रसिध्द करावेत. जे वृत्तपत्र शासन मान्य दराने जाहिराती छापणार असतील त्यांनाच मंडळातर्फे जाहिराती, प्रसिध्दीसाठी देण्यात येतील.

विषय क्र. ९ :- मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय

मंडळाच्या विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर मा. सभापतींनी सूचना केली की, मंडळाच्या सिडको येथील वसाहतीत असलेले मोकळे भूखंड, भविष्यात विकसीत करावयाचे भूखंड, लेआऊटमध्ये सोडलेल्या जागा यावर अतिक्रमण झालेले आहे. त्यासंबंधीची माहिती मंडळास देण्यात यावी.

यावर मा. सभापतीं यांनी सांगितले की, कार्यकारी अभियंता व मिळकत व्यवस्थापक यांनी संपुर्ण वसाहतीतील लेआऊट काढून घ्यावे व [illegible] ले-आऊटमध्ये असलेल्या मोकळया जागा, भविष्यकालीन विकसीत भूखंड अथवा ले-आऊटमध्ये सुटलेला मोकळया जागा याची सद्यःपरिस्थिती काय आहे, कोणत्या जागांवर किती व कशा प्रकारचे अतिक्रमण झाले आहे याची माहिती तयार करावी व मंडळाच्या पुढील बैठकीत नकाशासह सादर करावी.

चर्चेच्या ओघात मुख्याधिकारी/औ.मं/ यांनी प्रतिपादन केले की, सिडको येथील मंडळाच्या वसाहतीतील अविष्कार कॉलनी, शुभश्री, साईनगर, सह्याद्री, अरुणोदय या वसाहतीतील खुल्या जागा व रस्ते हस्तांतरणाची प्रक्रिया चालु आहे. सदर वसाहतीतील जागेची मालकी सिडकोची नसल्याने हस्तांतरणासाठी तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे व त्यामुळे ओपनस्पेस, रस्ते हस्तांतरीत होऊ शकले नाही. याबाबत सिडको कार्यालयाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" घेऊन हस्तांतराची कार्यवाही करण्यास काही हरकत नसावी.

यावर शहर अभियंता यांनी सांगितले की, सिडकोची एन.ओ.सी. घेऊन वसाहतीतील खुल्या जागा व रस्ते हस्तांतरीत करुन घेता येतील.

पटलावरील विषय संपल्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

....